किरकोळ अर्ज क्र.४० / २०२६
चंद्रकला वि..ज्ञानोबा

नि.क्र. १ खाली

**फिर्यादी यांची शपथेवर पडताळणी दि. १४.०८.२०२६ रोजी.**

मी याद्वारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करुन सांगतो की,

माझे नांव – चंद्रकला रामचंद्र बडगीरे वय – ७० वर्षे
धंदा - घरकाम, रा. नांदुरा बु. ता. अहमदपूर जि. लातूर

आरोपी क्र. १ व २ हे माझे भाऊ आहेत. आरोपी क्र. ३ हे माझे जावाई आहेत व आरोपी क्र. ४ हे आमच्या भावकीतील आहेत. माझे शिक्षण झाले नाही. मला लिहीता वाचता येत नाही. मला मुलाने सही करण्यास शिकविले आहे. दि.१०.०३.२०२६ रोजी आरोपी क्र. १ यांनी माझे पतीला फोन केला होता. त्याने पंढरपूरला जायचे आहे असे सांगितले होते. माझे पतीने गावात सप्ताह आहे, जमत नाही असे सांगितले होते. आरोपी क्र. १ याने माझे पतीला असे सांगितले होते की, आमच्या बहीणीला पाठवा. त्याच्या आगोदर दिड महिना, आरोप क्र. १ यांचा मुलगा याने नांदुरा येथे येऊन आधार कार्ड व बँकेचे पासबुक मागीतले होते. ते वडीलांचे शेतीचे अनुदान आले आहे असे सांगून मागीतले होते. त्यावेळी आधार कार्ड व पासबुक मी दिले होते.

२. दि. ११.०३.२०२६ रोजी आरोपी क्र. १ याने फोन केला होता. त्याने फोनवर आवरुन बसा, आम्ही घेण्यासाठी येत आहोत असे सांगीतले होते. आरोपी क्र. १ यांचा मुलगा हेमंत १०.०० वा. नेण्यास आला होता, आम्ही ११.०० वा. नांदुरा मधून निघालो होतो. तेथून आम्ही चाकूर येथे आलो होतो. त्यावेळी सर्व आरोपी चाकुर येथे हजर होते. त्यांनी मला सांगितले होते की, शेतीचे अनुदान उचलायचे आहे, त्यामुळे आम्ही आलो आहोत. त्यांनी माझे सहया व अंगठे ब-याच ठिकाण घेतले होते. त्यांनी मला कशावर सहया घेत आहेत हे सांगितले नव्हते. त्यानंतर दुसरीकडे घेऊन गेले. तेथे देखील माझे ब-याच ठिकाणी सहया व अंगठे घेतले. त्यावेळी देखील मला सहया व अंगठे कशासाठी घेत आहेत हे सांगितले नव्हते. त्यानंतर मी, आरोपी क्र. १ ते ३ आणि भावजय पंढरपूर येथे गेलो होतो.

३. पंढरपुरमध्ये एक मुक्काम केला होता. तेथे आंघोळ करुन देवदर्शन घेतले होते. त्यानंतर आम्ही गांजूरवाडी येथे आरोपी क्र. १ यांच्या घरी आलो होतो. त्यांनी मला

दोन तीन दिवस तेथे थांबविले होते. हेमंत कोलपुके यांनी मला नांदुर येथे आणून सोडले होते. दहा बारा दिवसानंतर मी माझा मुलगा कपील याला सांगितले की, मामाने अनुदानासाठी माझेकडून ब-याच ठिकाणी सहया व अंगठे घेतले आहेत. त्यानंतर कपील याने चाकूरला येऊन त्याबाबत चौकशी केली होती.

४. माझे मुलाला त्यावेळी समजले होते की, माझा हक्क उडविण्याकरीता ब-याच ठिकाणी सहया व अंगठे घेतले आहेत. त्यानंतर माझे मुलाने तहसिलला जाऊन कागद घेतले होते व चौकशी केली होती. त्यानंतर माझे मुलाने त्याबाबत सांगितले. मी चाकूर पोलीस ठाण्यात माझे सहया व अंगठे घेतले आहेत म्हणून मी अर्ज दिला होता. माझे सहया व अंगठे स्वखुशीने घेतले नव्हते. मी माझा हक्क स्वखुशीने सोडलेला नाही. त्यानंतर नांदगाव व गांजुरवाडी येथील तलाठयाकडे अर्ज दिले होते. पोलीस व तलाठी यांनी माझे अर्जानुसार कार्यवाही केली नाही. माझे मुलाने घेतलेले कागदपत्रे या प्रकरणात मी दाखल केले आहे. पोलीस ठाण्यात व तलाठी यांच्याकडे दिलेल्या अर्जाच्या प्रती देखील या प्रकरणात मी दाखल केले आहे. माझे आई वडीलांच्या मिळकतीवर मला हक्क मिळावा म्हणून मी सदरचा अर्ज केला आहे. आरोपींनी माझा वारसा उडविला आहे. माझे असे म्हणणे आहे की, माझा हक्क मला मिळावा व त्यांच्यावर कार्यवाही करावी.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

साक्षीदाराची सही/ अंगठा

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.08.14 15:23:52 +0530

(व्ही.एस. वाघमोडे )
न्यायदंडधिकारी प्रथमवर्ग, चाकूर

दि.१४.०८.२०२६